दैनिक

चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी

आयुष्यात सगळे **निर्णय** **आपले** नसतात, काही निर्णय **वेळ** आणि **परिस्थितीचे** असतात.

❊ वर्ष : ०१ ले ❊ | ❊ अंक : १०२ ❊ | ❊ शनिवार १४ नोव्हेंबर २०२६ ❊ | ❊ जालना ❊ | ❊किंमत : २ रूपये ❊ | ❊पृष्ठे : ४ ❊

◎Volume 01◎ | ◎ Issue 102 ◎ | ◎ Saturday, Date : 14 November 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎Price Rs. 2 ◎ | ◎Pages 4 ◎

जायकवाडी योजनेच्या श्रेयवादावरुन गोरंट्यालांचा खोतकरांना टोला!

जालना (प्रतिनीधी) जालना – जायकवाडी या नव्याने प्रस्तावित असलेल्या सुमारे बाराशे कोटी रुपये खर्चाच्या समांतर पाणी पुरवठा योजनेचे फुकटचे श्रेय घेण्याचा प्रयत्न कुणीही करू नये असा खोचक टोला जालन्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी आज शुक्रवारी विद्यमान आमदार अर्जुन खोतकर यांचा नामोल्लेख न करता त्यांना लगावला. याव्यतिरिक्त नवीन काही मंजूर करून त्यासाठी बाराशे नाही तर चौदाशे कोटी रुपये मंजूर करून आणा त्याचे आम्ही स्वागतच करू असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

शहरातील हॉटेल दुर्गा येथे आज शुक्रवारी दुपारी आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेस जालना मनपाच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत,पाणी पुरवठा सभापती सौ.पूनम स्वामी, ज्येष्ठ नगरसेवक महावीर ढक्का, रमेश गौरक्षक, रिमा काळे आदींची उपस्थिती होती. या पत्रकार परिषदेत माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी जायकवाडी – जालना या समांतर पाणी पुरवठा योजना आणि त्यासाठी मागील सहा ते सात महिन्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केलेल्या पाठपुराव्याची विस्तृत माहिती देऊन त्याबाबतचे लेखी पत्र उपस्थीत पत्रकारांना दिले. जालना शहरातील २०६० मधील लोकसंख्या गृहीत धरून उपरोक्त पाणी पुरवठा योजना प्रस्तावित करण्याच्या सूचना भाजपा नेत्यांनी दिल्याचे सांगून नाशिक येथील एकम व्हेंचस या कंपनीकडून सदर योजनेचा डीपीआर तयार करून घेण्यात आल्याचे गोरंटयाल यांनी स्पष्ट केले. सदर प्रस्तावित पाणी पुरवठा योजना ही वर्ल्ड बँकेच्या आर्थिक सहाय्यातुन करण्यात येणार असल्याने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आपण मे २०२६ मध्ये मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी विस्तृत चर्चा केल्यानंतर त्यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद देत योजनेच्या पडताळणीसाठी वर्ल्ड बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक जालना येथे पाठवले होते. त्यानंतर दि.२८ जुलै २०२६ रोजी वर्ल्ड बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पैठण येथील जॅकवेल आणि अंबड येथील जलशुद्धीकरण केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती. तसेच दि.९ ऑगस्ट २०२६ रोजी देखील वर्ल्ड बँकेच्या श्री अनिकेत आणि शकील नामक अधिकाऱ्यांनी या योजनेच्या अनुषंगाने जालना येथे भेट दिल्याचे त्यांनी सांगितले.



त्यानंतर दि.३१ ऑगस्ट २०२६ रोजी मंत्रालय पातळीवरील श्री रंगानायक आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्हीसीद्वारे आयोजित केलेल्या बैठकीत जालना मनपा आयुक्त अंजली शर्मा सहभागी झाल्या होत्या. या बैठकीत डीपीआर मध्ये असलेल्या तृटीचे कारण पुढे करून जालन्यासाठी प्रस्तावित असलेली जायकवाडी – जालना ही समांतर पाणी पुरवठा योजना नामंजूर करण्यात आली होती असे सांगून गोरंटयाल म्हणाले की, यानंतर आपण दि.८ ऑक्टोंबर २०२६ रोजी तातडीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन देऊन जायकवाडी – जालना या समांतर योजनेचा प्रस्ताव आणि आवश्यक निधीसाठी जागतिक बँकेकडे शिफारस करण्याची विनंती केली आहे. विशेष म्हणजे त्याच वेळी मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मित्राच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे गोरंटयाल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे, आ.संतोष पाटील दानवे, भाजपाचे जालना शहर महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे आणि आपण स्वतः यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा उपरोक्त प्रस्तावित योजनेच्या मंजुरीसाठी विशेष प्रयत्न केले असतांना कुंभकर्णा सारखी झोप काढणाऱ्या जालन्याच्या विद्यमान आमदाराने सदर योजना आपल्या पाठपुराव्यामुळे मंजूर होणार असल्याचा अजब आणि हास्यास्पद केलेल्या दाव्याची गोरंटयाल यांनी पत्रकार परिषदेत चांगलीच खिल्ली उडविली. जे काम आपल्या आणि भाजपा नेत्यांच्या पाठपुराव्यामुळे मंजूर झाले त्याचे फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न न करता नवीन काही योजना मंजूर करून दाखवा असे आव्हान देत नवीन योजना आणि निधी मंजूर करून आणल्यास त्याचे निश्चितच स्वागत करू असेही गोरंटयाल यांनी यावेळी पत्रकारांशी बोलतांना स्पष्ट केले.

शिवसेना तालुका प्रमुखपदी प्रदीप बोराडे यांची नियुक्ती



गजानन माळकर पाटील तालुका प्रतिनिधी मंठा : खा. संजयजी जाधव , मा.मंत्री आ. अर्जुन खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे यांचे सूचनेनुसार शिवसेना सचिव संजयजी मोरे यांच्या हस्ते शिवसेना नगरसेवक प्रदीप बोराडे यांची मंठा शिवसेना (शिंदे गट) तालुकाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती जाहीर होताच मंठा तालुक्यातील शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

प्रदीप बोराडे यांची ही नियुक्ती मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी शिवसेना सचिव संजय मोरे , परभणी लोकसभा संपर्कप्रमुख आनंद जाधव, जिल्हाप्रमुख तथा सभापती ए.जे. पाटील बोराडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किसनराव मोरे, माजी सभापती संतोष वरकड, परतूर तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, उपजिल्हाप्रमुख धनंजय पोहेकर, तालुका संघटक तुळशीराम कुहिरे, शिवसेना शहर संघटक पप्पू दायमा सचिन चव्हाळ यांच्यासह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

प्रदीप बोराडे यांनी शिवसेनेच्या माध्यमातून जनसेवेचे काम करत असताना सर्वसामान्यांचे प्रश्न, शहरातील विकासकामे आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यासाठी ते नेहमीच पुढे असतात. त्यांच्या याच कामाची दखल घेऊन पक्षाने त्यांच्यावर तालुकाप्रमुख पदाची मोठी जबाबदारी सोपवली आहे.

त्यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

नेर-सेवली सर्कलमधील गावांना २० तारखेपर्यंत पाणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट; १७३ वॉटर गेट सुरु करण्याचे काम युद्ध पातळीवर!

पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल; टेस्टिंग व ट्रायलदरम्यान पाणी वाया जाऊ देऊ नका : आ. बबनराव लोणीकर यांचे आवाहन

जालना / प्रतिनिधी : जालना तालुक्यातील नेर सर्कल तसेच नेर–शेवली सर्कलमधील काही गावांना पाणीपुरवठा करताना निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी १७३ वॉटर गेट परतूर येथून पाणी सुरू करण्यासंदर्भातील काम युद्धपातळीवर सुरू आहे. नेर–शेवली सर्कलमधील सर्व गावांना येत्या २० तारखेपर्यंत पाणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, संबंधित यंत्रणांनी समन्वयाने आणि गतीने काम पूर्ण करावे, असे निर्देश आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले आहेत. सध्या परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, धरणामध्ये केवळ १३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब अत्यंत महत्त्वाचा आहे. पाणी हेच जीवन असून पाण्याला अमृताची उपमा दिली जाते. त्यामुळे पाणीपुरवठा योजनेचे टेस्टिंग आणि ट्रायल घेत असताना कोणत्याही



परिस्थितीत पाण्याचा अपव्यय होणार नाही, याची विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन आमदार लोणीकर यांनी केले. प्रत्येक गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामसेवक यांनी पाणीपुरवठा सुरू करण्याच्या प्रक्रियेवर लक्ष ठेवावे. टेस्टिंगदरम्यान पाणी गळती होणार नाही किंवा विनाकारण पाणी वाहून जाणार नाही, याची काळजी घ्यावी. संबंधित गावांमध्ये पाणी पोहोचविण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रशासनाला सहकार्य करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच जालना, परतूर व मंठा येथील गटविकास अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संबंधित उपअभियंता, शाखा अभियंता **(पान ३ वर)**

जालना शहरात गावठी कट्ट्याचा धक्कादायक प्रकार उघड; २० हजारांचा गावठी कट्टा जप्त!

सदर बाजार डीबी पथकाची धडाकेबाज कारवाई; दोन संशयितांची चौकशी, रेकॉर्डवरील आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल



जालना । प्रतिनिधी : जालना शहरातील अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध सदर बाजार पोलिसांनी धडक कारवाई करत गावठी बनावटीचा कट्टा (अग्निशस्त्र) जप्त केला आहे. सदर बाजार डीबी पथकाने केलेल्या या कारवाईमुळे शहरातील अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

दि. १३ नोव्हेंबर २०२६ रोजी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या आदेशानुसार डीबी पथकाला पाहिजे फरार आरोपींचा शोध घेण्यासह अवैध धंद्यांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार डीबी पथक शहरात पेट्रोलिंग करीत असताना पोलीस निरीक्षक संदीप भारती यांना गोपनीय बातमीदारामार्फत जालना शहरातील कोठी गल्ली परिसरातील नंदू अभय पारवे (वय १९) याच्याकडे गावठी कट्टा असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप यांनी डीबी पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या. पथकाने नंदू अभय पारवे याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने जयेश राजपूत याच्याकडून गावठी कट्टा घेतल्याची माहिती दिली. पुढील चौकशीत जयेश राजपूत याने सदर गावठी कट्टा गोरज जिनिंग, गांधीनगर परिसरातील बाजूस लपवून ठेवल्याचे **(पान ३ वर)**

दिवाळीच्या सुट्टीत चोरट्यांचा डल्ला!

मुंबई: दिवाळी सणानिमित्त मोठ्या प्रमाणावर नागरिक बाहेर गावी जात असतात. याचाच फायदा घेत, मुंबईतील चुनाभट्टीमध्ये दिवाळीच्या सुट्ट्यांनिमित्त गावी गेलेल्या कुटुंबाच्या बंद घरावर चोरट्यांनी डल्ला मारला आहे. दिवाळी सणाच्या सुट्ट्यांसाठी गावी गेलेल्या एका कुटुंबाच्या बंद घराचा गैरफायदा घेत चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना मुंबईतील चुनाभट्टी परिसरात घडली आहे. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला असून पोलिसांकडून चोरांचा शोध घेतला जात आहे.

नेमकी घटना कशी घडली?

मिळालेल्या माहितीनुसार, ३५ वर्षीय शांताबाई कदम पती आणि १७ वर्षांच्या मुलीसह चुनाभट्टी येथील हिल रोडवरील वीरवली सोसायटीजवळ असलेल्या फातिमा बी चाळीत मार्च २०२६ पासून भाड्याने राहत आहे. दिवाळी साजरी करण्यासाठी हे कुटुंब ७ नोव्हेंबर रोजी सकाळी सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील इंदगाव या आपल्या मूळ गावी गेले होते. गावी निघण्यापूर्वी शांताबाई **(पान ३ वर)**

१२ वर्षांनंतर विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात ; अकोल्यातील साईबाबा विद्यालयात जुन्या आठवणींना उजाळा

विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी एकत्र खो-खो खेळत जपला जुन्या मैत्रीचा धागा

शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी घेतला स्नेहभोजनाचा आनंद

नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी : बदनापूर तालुक्यातील अकोला येथील साईबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात तब्बल १२ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.अनेक वर्षांनंतर मित्र–मैत्रिणी एकत्र आल्याने शाळेचा परिसर जुन्या आठवणींनी आणि हास्यविनोदाने गजबजून गेला होता.या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. शाळेतील गंमतीजमती, शिक्षकांचे मार्गदर्शन,वर्गातील किस्से



अशा विविध विषयांवर गप्पा रंगल्या.तब्बल १२ वर्षांनंतर एकमेकांची भेट झाल्याने सर्वांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.यावेळी शाळेतील शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या आनंददायी सोहळ्यात सर्व माजी विद्यार्थी आणि शिक्षकांनी एकत्र बसून स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.दीर्घ कालावधीनंतर पुन्हा एकदा शाळेच्या प्रांगणात एकत्र येण्याचा हा क्षण सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला. या स्नेहमेळाव्यामुळे जुन्या मैत्रीच्या नात्यांना पुन्हा उजाळा मिळाला.या स्नेह मेळाव्याला साईबाबा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री गजानन डोईफोडे सर,श्री.सानप सर,श्री जंगाळे सर,श्री. बोरुडे सर, श्री. शिंगणे सर यांनी सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तर शाळेचे माजी विद्यार्थी राहुल मुंडे,रामनाथ ढाकणे आणि सचिन गीते यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केलं.

काव्यसंग्रह 'हर्फ़ ज़ेरे लब'चे कवी अब्दुल रहीम अरमान जालनवी यांचा सत्कार

जालना : आज, दिनांक १३ नोव्हेंबर रोजी दु:खी नगर जुना जालना येथील साहित्यिक व्यक्तिमत्त्व अब्दुल रहीम अरमान यांच्या निवासस्थानी माजी नगरसेवक अय्युब खान यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार चे शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख तसेच गोदावरी शिक्षण संस्था व फेमचे जिल्हाध्यक्ष सोहेल सौदागर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शेख अलीमुद्दीन सर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी अरमान सर यांच्या शैक्षणिक व साहित्यिक कार्याचा परिचय करून दिला. अब्दुल गफ्फार झीशान यांनी आपल्या मनोगतात 'हर्फ़ ज़ेरे लब' हा काव्यसंग्रह युवकांसाठी कशाप्रकारे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरू शकतो, यावर आपले विचार व्यक्त केले.



प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी आपल्या मनोगतात युवकांनी पुस्तकांशी नाते जोडावे आणि वाचनाची आवड जोपासावी, असे आवाहन केले. यावेळी काझी नावीद यांनीही आपले विचार व्यक्त **(पान ३ वर)**

शांताबाई तापडिया यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी निधन

परतूर : प्रतिनिधी : परतूर शहरातील गोविंद तापडिया व डॉ. राजगोपाल तापडिया यांच्या मातोश्री शांताबाई तापडिया यांचे गुरुवारी रात्री वयाच्या ९१ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने तापडिया कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, शहरात हळहळ व्यक्त



करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. शुक्रवारी सकाळी ११ वाजता परतूर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, मित्रपरिवार तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शांताबाई तापडिया यांच्या निधनाने तापडिया कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

संपादकीय

जबाबदारी कोण घेणार ?

शेतकरी जगला तर शेती जगेल, शेती जगली तर अन्नसुरक्षा टिकेल आणि अन्नसुरक्षा टिकली तर देशाची अर्थव्यवस्था मजबूत राहील. मग शेतकऱ्याच्या आर्थिक सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य का दिले जात नाही? शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी अधिवेशनात भाषणे होतात, घोषणा होतात, आश्वासने दिली जातात; पण प्रत्यक्ष मदतीच्या वेळी त्याच्या वाट्याला तुटपुंजी रक्कम येत असेल तर ही व्यवस्था आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. म्हणूनच राज्यातील प्रत्येक आमदार, खासदार, मंत्री आणि शासनाच्या निर्णयांचे समर्थन करणाऱ्या प्रत्येकाने या प्रश्नाचे उत्तर द्यावे. पाच हजार रुपये देऊन शेतकऱ्यांचे नेमके कोणते प्रश्न सुटणार आहेत? शेतीच्या एका हंगामात झालेल्या हजारो रुपयांच्या नुकसानीची भरपाई या रकमेतून कशी होणार? आणि महागाईच्या काळात या रकमेत शेतकऱ्याने कुटुंबाची दिवाळी कशी साजरी करावी? शेतकऱ्यांना केवळ दिवाळीपुरती मदत नको, तर वर्षभर सन्मानाने जगता येईल अशी आर्थिक व्यवस्था हवी. मदतीच्या घोषणा करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला शाश्वत आधार देण्याची गरज आहे. पाच हजार रुपयांचा अग्रिम दिलासा हा अंतिम उपाय होऊ शकत नाही. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, शेतकऱ्यांच्या घामावर देशाचे पोट भरते; पण त्याच शेतकऱ्याच्या घरात दिवाळी साजरी करण्यासाठी पैशांची कमतरता असेल, तर हा केवळ शेतकऱ्याचा प्रश्न नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या संवेदनशीलतेचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाची किंमत पाच हजार रुपयांत मोजू नका. अन्नदात्याला मदतीची भीक नको, तर त्याच्या कष्टाला न्याय आणि जगण्याला सन्मान हवा!

शेतकऱ्यांसाठी मदतीची घोषणा झाली की त्यानंतर नवीन प्रश्न निर्माण होतात. कोण पात्र, कोण अपात्र, किती नुकसान झाले, कोणत्या नोंदीत नाव आहे, फार्मर आयडी आहे का, ई-केवायसी झाली आहे का, बँक खाते आधारशी जोडले आहे का, अशा अनेक अडचणींमुळे प्रत्यक्ष लाभार्थी शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची भीती निर्माण होते. शासनाने पात्र शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, प्रत्यक्षात एखाद्या शेतकऱ्याचे नुकसान झाले असेल आणि केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणामुळे त्याला मदत मिळत नसेल, तर त्याला न्याय कोण देणार? शेतकऱ्याने कार्यालयां चे उंबरठे झिजवायचे, कागदपत्रे जमा करायची आणि शेवटी मदतीच्या प्रतीक्षेत राहायचे, ही परिस्थिती बदलली पाहिजे. आज प्रत्येक आमदार, खासदार, मंत्री आणि सत्ताधारी पक्षाच्या समर्थकांनी एकदा ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या घरात जाऊन दिवाळी पाहावी. शेतकऱ्याच्या घरात फराळासाठी किती साहित्य आहे, मुलांसाठी नवीन कपडे घेण्याची ऐपत आहे का, घरातील वृद्ध आई-वडिलांच्या औषधांसाठी पैसे आहेत का, याची चौकशी करावी. शेतकऱ्याच्या घरात दिवाळीचा दिवा पेटतो, पण त्याच्या मनातील चिंतेचा अंधार कायम असतो. एका बाजूला कर्जाचा डोंगर, दुसऱ्या बाजूला पिकांचे नुकसान आणि तिसऱ्या बाजूला बाजारभावाची अनिश्चितता. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांची मदत देऊन शेतकऱ्याने आनंदाने दिवाळी साजरी करावी, अशी अपेक्षा ठेवणे कितपत योग्य आहे? शेतकरी कधीही सरकारकडे मोफत पैसा मागत नाही. तो आपल्या कष्टाचा योग्य मोबदला मागतो. त्याच्या मालाला हमीभाव मिळावा, नैसर्गिक आपत्तीमध्ये योग्य नुकसानभरपाई मिळावी, शेतीला पुरेसे पाणी मिळावे, वीज वेळेवर मिळावी आणि कर्जाच्या ओझ्यातून बाहेर पडण्यासाठी ठोस उपाययोजना व्हाव्यात, एवढीच त्याची अपेक्षा आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. देशाची अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि ग्रामीण जीवनाचा कणा म्हणजे शेतकरी, असे भाषणांमधून वारंवार ऐकायला मिळते. मात्र, प्रत्यक्ष मदतीची वेळ येते तेव्हा याच अन्नदात्याच्या पदरात किती पडते, हा प्रश्न उपस्थित होतो. आज शासनाने विविध घटकांना बोनसच्या स्वरूपात दहा हजार रुपये, अर्ध्या पगाराइतकी रक्कम किंवा पूर्ण पगाराइतका लाभ दिल्याच्या चर्चा आहेत. काही ठिकाणी अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिवाळीचा आर्थिक दिलासा मिळाला. यात गैर काहीच नाही. मेहनत करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला सणासुदीला आर्थिक मदत मिळालीच पाहिजे. पण मग वर्षभर ऊन, वारा, पाऊस आणि निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज देणाऱ्या शेतकऱ्याचा विचार करताना शासनाची हात आखडता भूमिका का? शेतकऱ्याला दिवाळी साजरी करण्यासाठी पाच हजार रुपये देऊन शासनाने नेमके काय साध्य केले? एवढ्या महागाईच्या काळात पाच हजार रुपयांत शेतकऱ्याच्या कुटुंबाची दिवाळी साजरी होऊ शकते का? घरातील किराणा, मुलांचे कपडे, फराळाचे साहित्य, दिवाळीचे दिवे, तेल, साखर, तेलबिया, औषधे, शेतीसाठी लागणारे साहित्य आणि रोजच्या गरजा भागवताना पाच हजार रुपये किती दिवस पुरणार? ज्या शेतकऱ्याच्या घामातून देशाच्या ताटात अन्न येते, त्याच्या घरात मात्र सणाच्या दिवशी आर्थिक विवंचना असावी, ही कोणत्या विकासाची निशाणी आहे? शेतकऱ्याला मदत करताना पाच हजार रुपयांचा आकडा शासनाला मोठा वाटतो; पण त्याच शेतकऱ्याने वर्षभरात शेतीवर केलेला खर्च, घेतलेले कर्ज, बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि वीजबिल यांचा हिशेब कोण मांडणार? पाऊस वेळेवर पडला नाही तर शेतकरी संकटात, अतिवृष्टी झाली तर संकटात, गारपीट झाली तर संकटात, बाजारभाव पडले तर संकटात आणि पीक हातात आले तरी विक्रीची हमी नाही. म्हणजे शेतकऱ्याच्या आयुष्यात संकटांचा पाऊस कधी थांबणार? शासनाने ३०४ दुष्काळी तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांसाठी प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जाहीर केली असून, त्यासाठी ७,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही मदत सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांसाठी आहे. त्यामुळे शासनाने काहीच केले नाही, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. परंतु प्रश्न मदतीच्या घोषणेचा नसून मदतीच्या रकमेचा आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष गरजांचा आहे. पाच हजार रुपये ही केवळ तात्पुरती अग्रिम मदत आहे; संपूर्ण पीक नुकसानभरपाई नाही. शेतकऱ्याच्या शेतातील पीक वाळून गेले, कापसाचे नुकसान झाले, सोयाबीनला अपेक्षित भाव मिळाला नाही, फळबागा पाण्याअभावी करपल्या, तर त्याच्या नुकसानीची भरपाई पाच हजार रुपयांनी कशी होणार? एका एकरात पीक घेण्यासाठी हजारो रुपयांचा खर्च येतो. बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि मशागतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकऱ्याला पिकातून उत्पन्न मिळाले नाही तर त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा होणार? मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न, घरखर्च, आरोग्य आणि बँकेचे कर्ज यांची जबाबदारी कोण घेणार?

तेज समभावानेच भारलेले असते



महत्त्वाची आहे. या दिवाळीत जो प्रकाश जन्माला येईल, तो अविवेकाचा अंधार दूर करणारा, समाजमनात निरंतर तेवणारा प्रकाश असावा, ही प्रार्थना यावर्षी सर्वाधिक समर्पक ठरेल...


आपल्या समाजात पांडित्याची कमी नाही. बोलक्या विद्वानांचा तर 'सुकाळू' आहे. जगद्गुरु संत तुकोबारायांनी ज्यांच्याविषयी 'बोले तैसा चाले। त्याची वंदीन पाऊले।।' असं म्हटलं होतं, तशा व्यक्ती समाजात किती आहेत? त्यांचाही दुष्काळच आहे. समाजाचा सद्सद् विवेक जागृत होण्यासाठी अशा सदाचरणी व्यक्तींची आपल्याला तीव्र गरज आहे. ज्ञानदेवांनी भाविक आणि त्याचा ईश्वर यातलं द्वैत संपण्याच्या स्थितीचं वर्णन करताना दिवा आणि दिव्याच्या प्रकाशाचा जो दृष्टांत दिला आहे, त्याचा संदर्भ घेऊन ज्ञानेश्वरीतील ओवींतूनच सांगायचं, तर

दीपा आणि प्रकाशा। एकवींकीचा पाडु जैसा।
तो माझां ठायी तैसा। मी तयामाजीं।।

वाचा आणि कृती यात कमीत कमी अंतर असलेल्यांची संख्या समाजात जसजशी वाढेल, तसतसं समाजाचं नैतिक बळ वाढत जाईल. दंभ आणि परोपदेशी पांडित्याने लदबदलेल्या अशा वांझ दीपस्तंभांतला अंधार उघडा पडेल आणि सामाजिक व्यवहार पारदर्शी होतील, तेव्हांच समाजाची पावलं उज्वल भविष्याकडे पडू लागतील. त्या पावलांना प्रकाशाची आस लागेल...

दिवाळीतली रोषणाई, फटाक्यांची पर्यावरणस्नेही आतषबाजी, पंचपक्वानाची मेजवानी करावीच. अंतःकरण आनंदाने उजळण्यासाठी तेही आवश्यकच आहे. ते उजळलं नाही आणि अंधारंच राहिलं, तर अंधाराचंच साम्राज्य अधिक दाट होईल! म्हणून ज्यांना शक्य आहे, त्यांनी ते करावंच. फक्त ते करताना ज्यांचे हात अशा दिवाळीपर्यंत पोहोचत नाहीत, त्यांची आठवण ठेवावी, एवढीच अपेक्षा. दुसऱ्याच्या आयुष्यातला अंध:कार मिटवण्याची जाणीव असेल, तरच या बाह्योपचारांपलिकडचा तुमच्या हृदयातला अंधकार नष्ट होईल. दिव्याचं बटन दाबलं, की प्रकाश पडतो. बाहेरचा अंधार मिटतो. आतल्या अंधाराचं काय? दिवाळी खरंतर त्यासाठी आहे. दिवाळीतले सगळे दिनविशेष याच संस्कारांचे आहेत. ते संस्कार झाले, तरच दिवाळी 'साजरी' झाली, असं म्हणता येईल. तुमची दिवाळी अशी संस्कारसंपृक्त, सार्थ; ज्ञानदेवांच्याच भाषेत 'दिपांच्या कोडी जैसे। एकची तेज सरिसे' - म्हणजे, दिवे कितीही असोत, त्यांच्या ज्योतीचे तेज समभावानेच भारलेले असते - हा साक्षात्कार देणारी ठरो, आणि हि दिपावली पाडवा आणि भावबीज आनंदात गेली असेल हीच आपणा सर्वांना मनःपूर्वक सदिच्छा...

Nvidia मध्ये मोठी उलथापालथ; गंभीर वादानंतर जेनसन हुआंग यांनी सोडले सीईओ पद



एनविडियाचे सहसंस्थापक जेनसन हुआंग यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. कंपनीचे अध्यक्ष, सीईओ आणि संचालक मंडळ सदस्य या पदांवरून पायउतार झाले आहेत.जेनसन हुआंग यांनी गेल्या ३३ वर्षांपासून कंपनीचे नेतृत्व केले होते. पण कथित चिनी गुप्तहेराच्या वादात अडकल्यानंतर हुआंग यांनी हा निर्णय घेतला. त्यांच्या निकटवर्ती असलेल्या महिलेवर चीनसाठी हेरगिरी केल्याचा अमेरिकी अधिकाऱ्यांना संशय होता. कंपनीने १२ नोव्हेंबर रोजी ही अधिकृत घोषणा केली. त्यांच्या राजीनाम्यानंतर कंपनीच्या मुख्य वित्तीय अधिकारी (उऋज) कोलेटी क्रेस यांची अंतरिम सीईओ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जेनसन हुआंग यांनी १९९३ मध्ये एनविडियाची सहस्थापना केली होती. तेव्हापासून त्यांनी या कंपनीचं नेतृत्व केलं होतं. पण आता त्यांना हे पद सोडावं लागलं आहे.

दुसरीकडे, कंपनीने कायमस्वरूपी सीईओ शोधाला सुरुवात केली आहे.

एनविडियाच्या संचालक मंडळाने मानले योगदानाबद्दल आभार

मीडिया रिपोर्टनुसार, हुआंग यांचे त्यांच्याच कंपनीतील एका महिला अधिकाऱ्यासोबत प्रेमसंबंध होते. पण सदर महिला चिनी गुप्तहेर असल्याची माहिती अमेरिकन अधिकाऱ्यांनी दिली. या खुलाशानंतर टेक विश्वात खळबळ उडाली होती. तसेच जेनसन हुआंग यांच्यावर पद सोडण्याचा दबाव वाढला होता. अखेर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. जेन्सन हुआंग हे एनविडियाचे सह-संस्थापक असून कंपनीमध्ये त्यांचा ३.६१% हिस्सा असून चौथे सर्वात मोठे गुंतवणूकदार आहेत. एनविडियामधून जेनसन यांच्या राजीनाम्यानंतर कंपनीच्या संचालक मंडळाने म्हटले की, हुआंग यांचे कंपनी आणि तंत्रज्ञान उद्योगातील योगदान महत्त्वपूर्ण आणि लक्षणीय आहे. एनविडिया ही आज जगातील सर्वात प्रभावशाली तंत्रज्ञान कंपन्यांपैकी एक आहे आणि याचे श्रेय काही अंशी हुआंग यांच्या योगदानाला जाते. त्याबद्दल कंपनी सदैव कृतज्ञ राहील. नेतृत्व बदलाचा एनविडियाला मोठा फटका इतकंच काय गुरूवारी एनविडियाच्या शेअर्समध्ये मोठी घसरण पाहायलामिळाली. प्री मार्केट ट्रेडिंगमध्ये एनविडियाचे शेअर्स ११ टक्क्यांहून अधिक घसरले होते. त्यामुळे या महिन्यात कंपनीच्या बाजारमूल्यात अंदाजे १ ट्रिलियन डॉलर्सची घट होण्याची शक्यता आहे. एनविडियाच्या नेतृत्व बदलामुळे गुंतवणूकदारांना भविष्यात कंपनीच्या एआय व्यवसायाच्या टिकाऊपणाबाबत अनिश्चितता वाटत आहे. त्यामुळे कंपनीचे शेअर्स धडाधड पडले.

'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजने'ला वेग, २५ मतदारसंघांत सह- अध्यक्षांची नियुक्ती!



मुंबई: महाराष्ट्र शासनाकडून शेतकऱ्यांच्या हितासाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजने'ची अंमलबजावणी अधिक प्रभावी व वेगवान करण्यासाठी राज्यातील २५ विधानसभा मतदारसंघांतील क्षेत्रस्तरीय समित्यांवर 'सह-अध्यक्ष' म्हणून नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विशेष निर्देशानंतर महसूल विभागाने यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय (ऋठ) जारी केला आहे. यापूर्वी १५ जुलै २०२६ रोजी राज्यातील तब्बल ९१ विधानसभा मतदारसंघांमध्ये सह-अध्यक्षांची निवड करण्यात आली होती. त्यानंतर आता उर्वरित २५ मतदारसंघांतील समितीच्या कामकाजाला गती देण्यासाठी नवीन सह-अध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना या नवनियुक्त प्रतिनिधींचा समित्यांमध्ये तात्काळ समावेश करून तातडीने कामकाज सुरू करण्याचे सक्त आदेश महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत. शेतकऱ्यांना होणार मोठा फायदा गावपातळीवर शेत आणि पाणंद रस्त्यांअभावी शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी किंवा शेतमाल बाजारात नेण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. हे प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी ही विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. स्थानिक पातळीवर सह-अध्यक्षांच्या नेमणुकीमुळे शेतकऱ्यांच्या अडीअडचणी थेट समितीपर्यंत पोहोचणे सोपे होणार असून, रखडलेली रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल, असा विश्वास महसूलमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

एअर इंडिया, एअर इंडिया एक्सप्रेसकडून सौदी अरेबियाच्या उड्डाणांवरील निर्बंध वाढवले; रियाध-दम्माम सेवा ३० नोव्हेंबरपर्यंत बंद



मुंबई : मध्यपूर्वेतील सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन टाटा समूहाच्या एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेस या विमान कंपन्यांनी सौदी अरेबियासाठीच्या काही उड्डाणांवरील निलंबनाची मुदत वाढवली आहे. रियाध आणि दम्माम येथून येणारी-जाणारी विमानसेवा ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत बंद राहणार आहे. तर जेद्दाहसाठीची उड्डाणे २१ नोव्हेंबर २०२६ पर्यंत निलंबित ठेवण्यात येणार आहेत. रियाध आणि दम्मामची उड्डाणे ३० नोव्हेंबरपर्यंत बंद एअर इंडियाने शुक्रवारी प्रवाशांसाठी जारी केलेल्या प्रवासविषयक सूचनेत ही माहिती दिली. प्रदेशातील सध्याची परिस्थिती लक्षात घेता एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसची रियाध व दम्माम येथून येणारी-जाणारी उड्डाणे ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत निलंबित राहतील, असे कंपनीने स्पष्ट केले. जेद्दाहसाठीची विमानसेवा मात्र २१ नोव्हेंबर २०२६ पर्यंत बंद राहणार आहे. त्यामुळे या मार्गांवर प्रवासाचे नियोजन केलेल्या भारतीय प्रवाशांना आपल्या प्रवासाच्या तारखा आणि विमानसेवेची सद्यस्थिती तपासावी लागणार आहे. इंडिगो आणि अकासा एअरनेही वाढवली होती निलंबनाची मुदत

यापूर्वी १० नोव्हेंबर रोजी इंडिगोने जेद्दाह आणि मदिना येथून येणारी-जाणारी उड्डाणे २१ नोव्हेंबरपर्यंत निलंबित ठेवण्याची घोषणा केली होती. तसेच अकासा एअरने गुरुवारी रियाध आणि जेद्दाहसाठीच्या सर्व उड्डाणांवरील निलंबन ३० नोव्हेंबरपर्यंत वाढवले होते. त्यामुळे सौदी अरेबियासाठीच्या विमानसेवेवर अनेक भारतीय विमान कंपन्यांनी निर्बंध कायम ठेवल्याचे चित्र आहे. प्रवाशांना तारीख बदलण्याची किंवा पूर्ण परतावा घेण्याची सुविधा एअर इंडियाने प्रवाशांना काही पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. १० नोव्हेंबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी निश्चित केलेल्या तिकिटांसाठी प्रवासाची तारीख बदलण्याची सुविधा देण्यात आली आहे. रियाध आणि दम्माम : नोव्हेंबर महिन्यातील प्रवासासाठी उपलब्धतेनुसार कोणतेही अतिरिक्त शुल्क न आकारता तारीख बदलता येईल. जेद्दाह : २१ नोव्हेंबरपर्यंतच्या प्रवासासाठी उपलब्धतेनुसार विनाशुल्क तारीख बदलण्याची सुविधा असेल.

तिकीट रद्द केल्यास : प्रवाशांना तिकिटाची संपूर्ण रक्कम परत मिळवण्याचा पर्याय उपलब्ध असेल. प्रवाशांनी विमानतळावर जाण्यापूर्वी संबंधित विमान कंपनीकडून आपल्या उड्डाणाची सद्यस्थिती तपासून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

अमेरिकन चलनाची हवा टाईट



वी दिल्ली: देशांतर्गत परकीय चलन विनिमय बाजारात (फॉरेक्स मार्केट) आज भारतीय रुपयाने अमेरिकी डॉलरच्या तुलनेत अत्यंत जोरदार मजबुती नोंदवत सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. देशांतर्गत शेअर बाजारातील सलग तेजी आणि परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून (ऋखख) मिळणारा अभूतपूर्व पाठिंबा यामुळे भारतीय चलनात ही घसघशीत वाढ पाहायला मिळत आहे. सकाळी ११ वाजेपर्यंतचा व्यवहार पूर्ण झाल्यानंतर भारतीय रुपया मागील बंद भाव ९३.९४०० रुपयांच्या तुलनेत थेट ०.२५२५ रुपये म्हणजेच सुमारे ०.२७ टक्क्यांनी मजबूत होऊन प्रति डॉलर ९३.६८७५ रुपयांच्या उच्च पातळीवर व्यवहार करताना दिसून आला.

आज सकाळी आंतरबँक परकीय चलन बाजारात भारतीय रुपया तब्बल २१ पैशांच्या मजबूत वाढीसह प्रति डॉलर ९३.७३ रुपयांच्या आधारावर खुला झाला होता. व्यवहार सुरू झाल्यानंतर काही वेळ आयातदारांकडून वाढलेल्या डॉलरच्या मागणीमुळे रुपया काही प्रमाणात घसरून ९३.८८२५ रुपयांच्या नीचांकी पातळीवर गेला होता. मात्र, त्यानंतर परदेशी गुंतवणूकदारांकडून समभाग बाजारात मोठ्या प्रमाणावर झालेली डॉलरची आवक आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली घसरण यामुळे रुपयाने अत्यंत दमदार पुनरागमन केले. परिणामी, रुपया मजबूत होत दिवसातील ९३.६७ रुपयांच्या उच्चांकी पातळीपर्यंत झेपावला. केवळ अमेरिकन डॉलरच नव्हे, तर जगातील इतर प्रमुख आंतरराष्ट्रीय चलनांच्या तुलनेतही आज भारतीय रुपयाने दमदार कामगिरी केली आहे. ब्रिटिश पौंडच्या तुलनेत भारतीय रुपयामध्ये आज मोठी मजबूती दिसून आली असून, मागील बंद भाव १२६.११२४ रुपयांच्या तुलनेत पौंड ०.७२ टक्क्यांनी घसरून १२५.२००८ रुपयांवर आला आहे. त्याचप्रमाणे, युरोपीय युनियनच्या युरोच्या तुलनेतही रुपया ०.४० टक्क्यांनी वधारून १०४.७२१० रुपयांच्या पातळीवर पोहोचला आहे. याशिवाय जपानी येन ०.६६ टक्क्यांनी घसरून ०.५९०६ रुपये आणि चिनी युआन ०.१७ टक्क्यांनी घसरून १४.०५५१ रुपयांवर व्यवहार करत आहेत. परकीय चलन बाजारातील तज्ज्ञांच्या मते, जागतिक पातळीवर डॉलर निर्देशांक १०२.२३ वर स्थिर असतानाही देशांतर्गत बाजारातील सकारात्मक वातावरणामुळे रुपयाला भक्कम आधार मिळत आहे. अमेरिकेतील महागाईचे आकडे आणि जागतिक रोखे बाजारातील घडामोडींमुळे गुंतवणूकदार सावध भूमिकेत असले, तरी ऋखख च्या खरेदीमुळे रुपयाचा कल सकारात्मक आहे. बाजार विश्लेषकांच्या मते, आजच्या सत्रात स्पॉट डॉलर-रुपया विनिमय दरासाठी ९३.५० रुपयांची पातळी मजबूत आधार ठरू शकते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

पान ४ वरून

परतूरमध्ये अवैध देशी

रंगाची स्विफ्ट डिझायर कार (क्रमांक एमएच-०२-सीआर-३५५७) थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये भिंगरी संत्रा कंपनीच्या लेबलच्या १८० एमएल क्षमतेच्या देशी दारूच्या एकूण ४८ बाटल्या आढळून आल्या. या दारूची किंमत ३ हजार ८४० रुपये, तर कारची अंदाजित किंमत ३ लाख रुपये असल्याने पोलिसांनी एकूण ३ लाख ३ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी ज्ञानेश्वर शंकरराव काकडे (वय ३६, रा. सोमणानी गल्ली, परतूर) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (अ) (ई) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी तसेच परतूर उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली परतूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक रोहित कलमदाने यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस हेडकॉन्स्टेबल देविदास जाधव, पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर वाघ, परमेश्वर माने आणि सुभान प्यारेवाले यांचा समावेश होता. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जनार्दन पालवे करीत आहेत.

केंधळी येथील मोटार चोरी

वेळोवेळी निवेदनेही दिली. मात्र, अद्याप एकाही शेतकऱ्याला त्यांचा मोटार पंप परत मिळालेला नाही. या चोरी प्रकरणाच्या तपासात हलगर्जीपणा करणाऱ्या किंवा प्रकरणात समाविष्ट असलेल्या संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी या निवेदनात केला आहे. या निवेदनावर केंधळी गावातील शेतकरी उल्हास घारे, योगेश घारे, शुभम घारे, आरुष घारे, ईश्वर तुकाराम बल्लाळ ,कैलास घारे, गुलाब कांबळे, भुजंग घारे, यांच्यासह इतर शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

पान ४ वरून

ऊसतोड कामगारांच्या

संसाराची व्यवस्था आणि त्यानंतर दिवसभर ऊसतोडणीचे कष्ट असे महिलांचे दुहेरी आयुष्य असते. उन्हाळ्यात अंगाची लाहीलाही करणारे ऊन, हिवाळ्यात कडाक्याची थंडी, पावसाळ्यात ओलसर परिस्थिती आणि बदलत्या हवामानाचा सामना करत या कुटुंबांचा दिनक्रम सुरू असतो. दिवसभर कोयत्याने ऊस तोडणे, मोळ्या बांधणे आणि वाहतुकीसाठी ऊस तयार करणे, या कष्टाच्या कामातून त्यांचा उदरनिर्वाह चालतो.

या संघर्षाचा सर्वाधिक परिणाम त्यांच्या लहान मुलांच्या बालपणावर होताना दिसतो. अनेक मुलांना आई-वडिलांसोबत स्थलांतर करावे लागते. तात्पुरत्या राहुट्यांमध्ये त्यांचे बालपण घडते. नियमित शिक्षण, खेळण्यासाठी सुरक्षित जागा, आरोग्य, पोषण आणि बालपणातील आनंदाच्या अनेक गोष्टींपासून त्यांना वंचित राहावे लागू शकते. आपण आपल्या मुलांसाठी दिवाळीची खरेदी करतो, नवीन कपडे घेतो, फराळ बनवतो आणि फटाके आणतो. मात्र याच वेळी काही चिमुकली आपल्या आई-वडिलांच्या संघर्षात बालपण जगत असतात. त्यांच्या आयुष्यातही दिवाळीचा आनंद पोहोचावा, ही भावना या उपक्रमामागे होती.

समाजकारण हे राजकीय महत्त्वाकांक्षेपलीकडेही असू शकते!

आजच्या सामाजिक परिस्थितीत अनेक सामाजिक उपक्रम गाव, वार्ड, जिल्हा परिषद गट, पंचायत समिती गण, विधानसभा किंवा लोकसभा मतदारसंघ अशा विविध स्तरांवर राबवले जातात. सामाजिक कार्याच्या माध्यमातून जनसंपर्क निर्माण होणे किंवा लोकांपर्यंत पोहोचणे ही एक बाब असली, तरी प्रत्येक सामाजिक उपक्रमामागे राजकीय हेतू किंवा वैयक्तिक महत्त्वाकांक्षा असणे आवश्यक नाही.

समाजात असे अनेक घटक आहेत, ज्यांच्याकडे निवडणुकीच्या काळात किंवा राजकीय कार्यक्रमांच्या वेळी फारसे लक्ष जात नाही. ऊसतोड कामगार, रोजंदारीवर जगणारे मजूर, स्थलांतरित कुटुंबे आणि त्यांच्या मुलांपर्यंतही आपल्या सामाजिक जाणिवा पोहोचल्या पाहिजेत. एखाद्या सार्वजनिक कार्यक्रमाला वर्गणी देणे, मंडळांना सहकार्य करणे किंवा विविध कार्यक्रमांत सहभागी होणे याप्रमाणेच एखाद्या गरजू कुटुंबाच्या आनंदात सहभागी होणेही सामाजिक जबाबदारीचा एक भाग आहे. समाजकारण हे केवळ राजकीय व्यासपीठ किंवा प्रसिद्धीचे माध्यम नसून, आपल्या परीने समाजातील गरजू आणि दुर्लक्षित घटकांसाठी काहीतरी करण्याची संवेदनशील भावना आहे.

या उपक्रमातून कोणाशीही तुलना करण्याचा, कोणावर टीका करण्याचा किंवा कोणत्याही राजकीय गटाला लक्ष्य करण्याचा हेतू नाही. कोणतीही निवडणूक, पद, राजकीय पक्ष किंवा वैयक्तिक महत्त्वाकांक्षा डोळ्यांसमोर न ठेवता, माणुसकीच्या भावनेतून शक्य तेवढे सामाजिक योगदान देण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

दानशूर व्यक्तींचे सहकार्य; प्रसिद्धीपासून दूर राहण्याची भावना!

या उपक्रमासाठी काही दानशूर व्यक्तींनी स्वतःचे नाव प्रसिद्ध न करण्याची इच्छा व्यक्त करून आर्थिक सहकार्य केले. तसेच प्रत्यक्ष उपस्थित राहून नियोजन, साहित्य संकलन, पॅकिंग, वितरण आणि इतर स्वरूपात मदत करणाऱ्या मित्रपरिवारानेही मोलाचे योगदान दिले. या सर्व सहकार्यामुळे ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांपर्यंत दिवाळीचे साहित्य पोहोचवता आले. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या आर्थिक व श्रमदानातून सहकार्य करणाऱ्या सर्व हितचिंतकांचे आणि मित्रपरिवाराचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

पान ४ वरून

यावेळी चि. अमोल रघुनाथ माने यांचा वाढदिवसही ऊसतोड कामगारांच्या चिमुकल्यांसोबत आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसाचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता इतरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवता आले, तर त्यातून मिळणारे समाधान वेगळेच असते, ही भावना यामागे होती.

दुष्काळाच्या संकटात शेतकरी

साधताना तिला भविष्यात पोलीस अधिकारी होण्याची इच्छा असल्याचे समजले. तिच्या या स्वप्नाला बळ देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तिच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. तसेच भविष्यात तिच्या विवाहाची जबाबदारीही घेण्याची घोषणा केली. आर्थिक परिस्थितीमुळे मुलींच्या शिक्षणाला किंवा त्यांच्या भवितव्याला मर्यादा येऊ नयेत, या भावनेतून घेतलेल्या या निर्णयामुळे तांगडे कुटुंबाला मोठा आधार मिळाला आहे. एका शेतकरी कुटुंबातील मुलीच्या स्वप्नांना शासनस्तरावरून मिळालेला हा पाठिंबा ग्रामीण भागातील इतर कुटुंबांसाठीही प्रेरणादायी ठरणारा आहे.

जालना जिल्ह्यासह राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. पाच हजार रुपयांची अग्रीम मदत, पीक नुकसानभरपाई, पीक कर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुलीला स्थगिती, शैक्षणिक शुल्कात सवलत आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अशा उपाययोजनांचा त्यात समावेश आहे. याशिवाय दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी कुटुंबांतील मुलींचे विवाह आर्थिक अडचणींमुळे रखडू नयेत, यासाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला आहे. महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन, विद्यार्थिनींना सायकली आणि गरजू कुटुंबांना दिवाळीचा शिधा देण्याचे उपक्रमही राबविण्यात येत आहेत.

भाऊबीजेच्या निमित्ताने तांगडे कुटुंबातील मंदाबाई यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे औक्षण केले. यावेळी त्यांनी कुटुंबातील सदस्यांना कपडे भेट दिले. तांगडे कुटुंबीयांनीही त्यांना ज्वारी, बाजरी आणि छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन आपुलकी व्यक्त केली. शासनातील वरिष्ठ पदावरील व्यक्तीने आपल्या घरी येऊन सुख-दुःखाची विचारपूस केल्याने समाधान वाटत असल्याची भावना अंबादास तांगडे यांनी व्यक्त केली.

दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकरी कुटुंबाला केवळ आर्थिक मदतीची नव्हे, तर मानसिक आधाराचीही गरज असते. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भिलपुरीतील तांगडे कुटुंबाच्या भेटीदरम्यान शिक्षण आणि विवाहाची जबाबदारी स्वीकारण्याची घोषणा ही अशाच सामाजिक संवेदनशीलतेचे उदाहरण ठरली आहे. मुलीच्या पोलीस अधिकारी होण्याच्या स्वप्नाला मिळालेला आधार हा तिच्या भविष्यासाठी आशादायी ठरणारा आहे.

पश्चिम रेल्वेवरील वसई रोड आणि वैतरणा स्थानकां दरम्यान रात्रकालीन ब्लॉक, रविवारची स्थिती काय?



पालघर: पश्चिम रेल्वेवर येत्या शनिवारी आणि रविवारी रात्रकालीन मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबईकरांनो जर तुम्ही शनिवारी रात्री उशिरा पश्चिम रेल्वेने प्रवास करणार असाल तर, एकदा ही बातमी आवश्य वाचा. पश्चिम रेल्वेवरील वसई रोड आणि वैतरणा स्थानकादरम्यान काही तांत्रिक कामांसाठी मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. जलद मार्गावरील अप आणि डाऊन या दोन्हीही मार्गिकेंवर हा मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. शनिवारी आणि रविवारी रात्रकालीन मेगाब्लॉक घेण्यात आल्यानंतर, रविवारच्या दिवशी पूर्ण दिवस, पश्चिम रेल्वेवर कोणताही मेगाब्लॉक घेण्यात येणार नाही. पश्चिम रेल्वेवरील वसई रोड आणि वैतरणा स्थानकांदरम्यान शनिवारी आणि रविवारी १४ नोव्हेंबर आणि १५ नोव्हेंबरच्या रात्री मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी, विनीत अभिषेक यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, हा 'जम्बो ब्लॉक' शनिवारी आणि रविवारीच्या रात्री वसई रोड आणि वैतरणा स्थानकांदरम्यान 'अप' (णि) जलद मार्गावर रात्री ११.५५ ते मध्य रात्री ०२.५५ पर्यंत आणि 'डाउन' (ऊ्रम) जलद मार्गावर मध्य रात्री ०१.३० ते पहाटे ०४.३० वाजेपर्यंत मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. रविवारी, १५ नोव्हेंबर २०२६ रोजी दिवसाच्या वेळी कोणताही 'जम्बो ब्लॉक' नसेल. दरम्यान, मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात, विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी रविवारी, १५ नोव्हेंबर २०२६ रोजी उपनगरीय मार्गांवर 'मेगा ब्लॉक' घेण्यात येणार आहे. ठाणे आणि कल्याण स्थानकांदरम्यान 'अप' आणि 'डाऊन' धिम्या मार्गांवर सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत ब्लॉक असेल. मुलंड स्थानकावरून सुटणाऱ्या 'डाऊन' धिम्या आणि सेमी फास्ट लोकल सेवा सकाळी १०.४३ ते दुपारी ०३.५३ या वेळेत मुलंड आणि कल्याण स्थानकांदरम्यान 'डाऊन' जलद मार्गावर वळवल्या जातील. कल्याण स्थानकावरून सुटणाऱ्या 'अप' धिम्या आणि सेमी फास्ट लोकल सेवा सकाळी १०.३६ ते दुपारी ०३.५१ या वेळेत कल्याण आणि मुलंड स्थानकांदरम्यान 'अप' जलद मार्गावर वळवल्या जातील.

अहिल्यानगरमध्ये दीपावलीच्या रात्री २१ ठिकाणी आगीच्या घटना; अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे टळल्या दुर्घटना



अहिल्यानगर (प्रतिनिधी) : दीपावलीच्या सणानिमित्त अहिल्यानगर शहरात सर्वत्र आनंद आणि उत्साहाचे वातावरण असतानाच, फटाके, विद्युत रोषणाई व अन्य कारणांमुळे शहरासह परिसरात एकाच रात्री वेगवेगळ्या २१ ठिकाणी आग लागल्याच्या घटना घडल्या. संध्याकाळी साडेसात वाजल्यापासून ते पहाटे दोन वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाची मोठी धावपळ उडाली. मात्र, जवानांच्या तत्परतेमुळे सर्व आगींवर वेळत नियंत्रण मिळवण्यात यश आले असून संभाव्य जीवित आणि वित्तहानी टळली आहे.

दीपावलीच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी आणि दिव्यांची रोषणाई करण्यात आली होती. याच काळात शहरातील विविध भागांतून आगीच्या तक्रारी अग्निशमन विभागाकडे प्राप्त झाल्या. सिद्धार्थनगर मधील बालभवनजवळ, जुन्या सिव्हिल हॉस्पिटल परिसरातील बागडपट्टी येथील दुकान, भिंगारमधील सिटीझन कॉलनीतील नारळाचे झाड, तसेच लालटाकी परिसरातील पेट्रोल पंपाजवळील भंगार दुकानाला आग लागली. पत्रकार कॉलनी आणि माणिकनगर येथेही नारळाच्या झाडाला आग लागल्याच्या घटना घडल्या. तसेच नगर-कल्याण रोडवरील रेल्वे ब्रिजजवळील मोकळी जागा, गुलमोहर रोडवरील पारिजात चौक, डी-मार्ट समोरील पानटपरी, बालिकाश्रम रोडवरील न्यूक्लिअस हॉस्पिटलसमोर आणि प्रोफेसर चौकातील मकासरे हेल्थ क्लब परिसरात आगीच्या घटनांची नोंद झाली. माळीवाड्यातील भापकर हॉस्पिटल शेजारी, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलसमोर आणि तारकपूर येथील झुलेलाल मंदिर परिसरातही आगीची वर्दी मिळाली. या शिवाय जिल्हा परिषदेजवळ बसस्थानकासमोर, सिव्हिल हॉस्पिटलसमोरील सारडा कॅन्टीनच्या मागे, बागडपट्टी येथील सम्राट इलेक्ट्रिकसमोर, तपोवन रोडवरील सूर्यनगर परिसरातील मारुती मंदिरासमोर, शंकर महाराज मठाजवळ बोराटे यांच्या घराजवळ आणि गंज बाजारातील जामगांवकर ज्वेलर्सच्या टेरेसवरील टॉवरला आग लागली. रामवाडीतील एसटी वर्कशॉपजवळ, नेप्ती नाका चौकातील ठाणगे मळा, बाळाजीबुवा विहिरीजवळ लाकडाला आणि वारूळाचा मारुती रोडवरील गार्डन वेस्टलाही आग लागल्याच्या घटना घडल्या. या सर्व घटनांची माहिती मिळताच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. काही ठिकाणी गवत, कचरा आणि झाडांना आग लागली होती, तर काही ठिकाणी दुकाने, पानटपरी, भंगार साहित्य आणि इमारतीवरील टॉवरला आग लागल्याने जवानांना अधिक सतर्कता बाळगावी लागली. आगीचा फैलाव होऊ नये, यासाठी जवानांनी अथक प्रयत्न करून सर्व आगी आटोक्यात आणल्या. दीपावलीच्या रात्री एकाच वेळी २१ ठिकाणी आग लागल्यामुळे मोठी धावपळ उडाली होती, परंतु जवानांच्या वेळेत पोहोचण्याच्या क्षमतेमुळे मोठी दुर्घटना टळल्याची माहिती महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली. या पार्श्वभूमीवर, सणासुदीच्या काळात नागरिकांनी फटाके फोडताना आणि विद्युत रोषणाई करताना आवश्यक ती काळजी व खबरदारी बाळगावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

पान १ वरून

जालना शहरात गावठी

त्यानंतर डीबी पथकाने जयेश किशोरसिंग राजपूत (वय २१, रा. बालाजी गल्ली, गांधीनगर, जालना) याला ताब्यात घेऊन विचारपूस केली. त्याने दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी लपवून ठेवलेला गावठी बनावटीचा कट्टा हस्तगत केला. अंदाजे २० हजार रुपये किमतीचे हे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप व डीबी पथकातील अंमलदारांनी केली. अवैध शस्त्रांविरुद्ध पोलिसांचा धडाका सुरूच असून, शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांकडून कठोर कारवाई केली जात आहे.

दिवाळीच्या सुट्टीत

यांनी घरातील लाकडी कपाटाच्या कप्प्यात, साड्यांच्या खाली दोन सोन्याच्या बाळ्या, एक नथ आणि दोन वाट्यांचे सोन्याचे मंगळसूत्र काळजीपूर्वक ठेवले होते. घरी परतल्यावर बसला धक्का दिवाळीची सुट्टी संपवून हे कुटुंब १३ नोव्हेंबर रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास आपल्या घरी परतले. घरी पोहोचल्यानंतर शांतबाई यांना घराच्या खिडकीला बसवलेली लोखंडी ग्रील काढून खाली जमिनीवर पडलेली दिसली. त्यांनी तातडीने मुख्य दरवाजाचे कुलूप उघडून आत प्रवेश केला, तेव्हा घरातील सर्व सामान अस्ताव्यस्त पडले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ धाव घेऊन कपाटाची पाहणी केली असता, कपाटात ठेवलेले सोन्याचे मौल्यवान दागिने गायब असल्याचे समजले. चोराने बंद घराची खिडकी तोडून आत प्रवेश केला आणि सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला.

९६ हजारांचा मुद्देमाल लंपास

चोरीला गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांमध्ये तब्बल पाच ग्रॅम वजनाचे आणि अंदाजे ४०,००० रुपये किंमतीचे दोन वाट्यांचे सोन्याचे मंगळसूत्र, सहा ग्रॅम वजनाचे आणि ४८,००० रुपये किंमतीची सोन्याच्या कानातील कुड्यांची जोडी आणि ८००० रुपये किंमतीची एक ग्रॅमची सोन्याची नथ यांचा समावेश आहे. या सर्व चोरी गेलेल्या दागिन्यांची किंमत सध्याच्या घडीला ९६,००० रुपये इतकी असल्याची फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. शांतबाई कदम यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे चुनाभट्टी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांतर्गत एफआयआर (ऋखठ) नोंदवला आहे. सणवाराच्या दिवसांत घर बंद करून बाहेर जाणाऱ्या नागरिकांसाठी ही घटना एक धोक्याची घंटा ठरली असून, पोलीस आता परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोराचा कसून शोध घेत आहेत.

नेर-सेवली सर्कलमधील

कार्यकारी अभियंता यांनी पाणीपुरवठा योजनेच्या कामावर काटेकोर देखरेख ठेवावी. तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून निर्धारित वेळेत सर्व गावांपर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. ग्रेडच्या पाण्याचा अपव्यय होणार नाही, याची प्रत्येक अधिकाऱ्याने जबाबदारीने दक्षता घ्यावी, असे निर्देशही आमदार लोणीकर यांनी दिले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी जपून वापरणे ही केवळ प्रशासनाचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. त्यामुळे सर्व ग्रामस्थांनी पाणीपुरवठा योजनेला सहकार्य करावे आणि पाण्याचा एकही थेंब वाया जाणार नाही, यासाठी सजग राहावे, असे कळकळीचे आवाहन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे.

काव्यसंग्रह 'हर्फ़ ज़ेरे

केले. सत्काराला उत्तर देताना अब्दुल रहीम अरमान यांनी आपले मनोगत अत्यंत समर्पक व प्रभावी शब्दांत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात अय्युब खान यांनी 'हर्फ़ ज़ेरे लब' या पुस्तकाच्या प्रकाशनाबद्दल अब्दुल रहीम अरमान यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख रियाज सर, शाकीर शेख सर, काझी सरमद, मोहम्मद इर्शाद आणि मोहम्मद अखलाक यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अलीमुद्दीन शेख सर यांनी उत्तम प्रकारे केले, तर आभार प्रदर्शन सय्यद अनीस यांनी केले.यावेळी मोठ्या संख्येने मित्रपरिवार व साहित्यप्रेमी उपस्थित होते.

अहवाल ..

नाईट फ्रँक संस्थेचा
श्रीमंतीचा अहवाल
पर्वणी रे आनंदाची
भलतेचं खूश व्हाल

भारतीयअब्जाधीश
वाढत राहती महाल
श्रीमंतीचे प्रमाणपत्र
कित्येकां होई बहाल

श्रीमंतीसंख्या वाढेलं
चकीत होऊन रहालं
अनेक होणारं कुबेर
भविष्या दिसे कमाल

कर्जाचा बोजा वाढून
हैराण होणारं हमाल
दारिद्र्याचे कसे काय
अरूत्तरीत ते सवाल

दारिद्र्य रेषा सतावते
करून टाकले बेहाल
महागाई का चिडली
अधीक झाली जहाल

हात पाय पसरत राहे
झोपडपट्ट्या बकाल
उघडा पडलेला चेहरा
पायांना जसे झाकालं

लक्ष्मी श्रीमंत महाली
राहूदे सुखात खुशाल
गरीबा देऊन चारघास
बनवाल का खुशहालं

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

ससे ..

मध्यम वर्गीय असे
भ्यालेले जसे ससे
किती कर अन्याय
निमूट सगळे सोसे

भयभीत करीभारी
वाघाचेपायाचे ठसे
तोंड बांधे महागाई
सरासरा मारी ठोसे

जळी स्थळी सर्वत्र
टाकत राही उसासे
फासातअडके मान
कशी अंध विश्वासे

पेटलेल्या महागाई
जगतात कसे बसे
कितीही वाढो भाव
निवांत शांत ते बसे

माहीत ना ओरडणे
विकून टाकले घसे
चेष्टामस्करीचालली
करूनि घेतात हसे

जगात चालले युद्ध
होती कसे वेडेपिसे
श्रीमंत यादी पाहूनि
फिरतात मोर पिसे

बदले जरी हे विश्व
आम्हीराहणारं असे
मरताना कर्जे मागे
रिकामचोट ते खिसे

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

स्वभाव ..

सणासुदीचे वेळी
अवेळी वाढे भाव
कुठेचं न अटकाव
व्यापा-यांचा डाव

मध्यमवर्गीय सण
विकत घ्या बेभाव
निमूटपणे सोसावे
अंगभूत रे स्वभाव

माहीत असे पक्के
नसे लागत निभाव
एकामागून रे दुसरे
सोसत रहावे घाव

घरात ती चीडचीड
लढायचाआविर्भाव
चार भिंतीत केवळ
पडतो उगा प्रभाव

शूर वीर असल्याचे
करत बसे हावभाव
भिती भयंकर रोग
होई नीत प्रादुर्भाव

वृत्ती नसे लढायची
मानत तया सद्भाव
अंगा कसली शक्ती
कोण करे अजमाव

सामान्य सर्व मान्य
वाटे त्याचाअहंभाव
बदलणार ना काही
जोवरअसा स्वभाव

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

अन्न नियोजन ..

अन्न धान्य स्वयंपूर्ण
मुबलकता रे देशात
फिरत राही भूक का
रे वेगवेगळ्या वेशात

भुकेपेक्षा जास्तअन्न
वाढून घेतात ताटात
रास लागे व्यंजनाची
बकासूराच्या थाटात

धान्यकुजे कोठारात
कोसळत्या पावसात
भुसभूशीत करे घुशी
किडे लावी वासलात

कोण जो जबाबदार
उभे करा पिंज-यात
अधिकारी कर्मचारी
फिरती कसे तो-यात

मोत्यासम पीक आले
साठे बाजी गोदामात
महागाई ती ठाई ठाई
दलाल नफाआरामात

अन्न आहे हे परब्रह्म
जाग आण माणसात
उष्टावळी पुरे आता
तीळएक खाती सात

इच्छा आणा सत्यात
थाळी मिळो स्वस्तात
सु नियोजन अर्थपूर्ण
देऊ शकतो फुकटात

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

हिवाळी अधिवेशनात एसटी आरक्षणासंदर्भात प्रश्न उपस्थित करण्यासाठी आ.लोणीकरांना शिष्टमंडळाचे निवेदन



जालना । प्रतिनिधी : बंजारा समाजाला एसटी (अनुसूचित जमाती) प्रवर्गातून आरक्षण मिळावे आणि या संवेदनशील विषयावर आगामी हिवाळी अधिवेशनात आवाज उठवावा, या मागणीसाठी लढाऊ योद्धे व उपोषणकर्ते विजय नायक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली परतूर-मंठा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांना निवेदन देण्यात आले. राज्यातील बंजारा समाज गेल्या अनेक वर्षांपासून घटनात्मक हक्काच्या एसटी आरक्षणासाठी शांततामय व लोकशाही मार्गाने लढा देत आहे.समाजाच्या शैक्षणिक,सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी हे आरक्षण अत्यंत गरजेचे आहे. आगामी हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न सभागृहात आक्रमकपणे मांडून शासनाचे लक्ष वेधावे आणि समाजाला न्याय मिळवून द्यावा,अशी विनंती या निवेदनाद्वारे आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडे करण्यात आली आहे.तसेच निवेदन स्वीकारल्यानंतर आमदार बबनराव लोणीकर यांनी समाजाच्या भावना समजून घेत या विषयावर सकारात्मक भूमिका मांडण्याचे व अधिवेशनात हा प्रश्न लावून धरण्याचे आश्वासन दिले.या प्रसंगी विजय नायक चव्हाण,कैलास आढे,संजय चव्हाण,कार्तिक राठोड,अजय आढे,रवि आढे,सिताराम राठोड,नवनाथ आढे यांच्यासह समाजातील अनेक कार्यकर्ते,पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रब्बी हंगामाला मिळणार नवसंजीवनी!

जालना : पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामात मोठ्या नुकसानीला सामोरे गेलेल्या शेतकऱ्यांना अखेर दिलासादायक बातमी मिळाली आहे. जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यातून रब्बी हंगामासाठी पहिल्या आवर्तनाचे पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यासह छत्रपती संभाजीनगर आणि परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांना मोठा आधार मिळणार आहे. जायकवाडीच्या कालव्यातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे तब्बल १ लाख ४१ हजार ६४० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. पुढील २५ दिवस पाणी सोडण्याचे नियोजन असून, डाव्या तसेच उजव्या कालव्यातून पाणीपुरवठा केला जाणार आहे. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर रब्बी हंगामासाठी पाण्याची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या नजरा जायकवाडीच्या पाण्याकडे लागल्या होत्या. अखेर आवर्तन सुरू झाल्याने गहू, हरभरा, ज्वारीसह विविध रब्बी पिकांना सिंचनाची सुविधा मिळणार आहे. दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या बळीराजासाठी जायकवाडीचे पाणी 'नवसंजीवनी' ठरणार असून, रब्बी हंगामाच्या उत्पादनाला यामुळे मोठी आशा निर्माण झाली आहे.

परतूरमध्ये अवैध देशी दारू वाहतूक करणाऱ्या कारवाईत ३ लाखांचा मुद्देमाल जप्त!

स्विफ्ट डिझायर कारसह ४८ देशी दारूच्या बाटल्या पोलिसांच्या ताब्यात; एकाविरुद्ध गुन्हा दाखल



परतूर : प्रतिनिधी : परतूर शहरात अवैध देशी दारूची विक्री करण्याच्या उद्देशाने कारमधून वाहतूक करणाऱ्या एका इसमाविरुद्ध परतूर पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत देशी दारूच्या ४८ बाटल्यांसह वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली स्विफ्ट डिझायर कार असा एकूण ३ लाख ३ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. ही कारवाई गुरुवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास गार्डन हॉटेल परिसरात करण्यात आली. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, परतूर पोलीस ठाण्याचे अंमलदार हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदारामार्फत गार्डन हॉटेल परिसरातून पांढऱ्या रंगाच्या मारुती स्विफ्ट डिझायर कारमधून अवैधरित्या देशी दारूची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून पोलिसांनी पंचांसह संबंधित रस्त्यावर सापळा रचला. दरम्यान, संशयित पांढऱ्या **(पान ३ वर)**

केंधळी येथील मोटार चोरी प्रकरणाचा तपास थंड बस्त्यात; संबंधितावर कारवाई न झाल्यास शेतकऱ्यांचा आमरण उपोषणाचा इशारा



गजानन माळकर पाटील

तालुका प्रतिनिधी मंठा : मंठा तालुक्यातील केंधळी गावात गेल्या चार महिन्यांपासून शेतकऱ्यांच्या विद्युत मोटार पंप चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. याप्रकरणी वारंवार निवेदने आणि तक्रारी देऊनही पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या केंधळी येथील समस्त शेतकऱ्यांनी आज (दि. १३ नोव्हेंबर २०२६) मंठा पोलीस निरीक्षकांना निवेदन दिले आहे. येत्या आठ दिवसांत या प्रकरणाशी संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करून शेतकऱ्यांचे चोरीस गेलेले मोटार पंप परत न मिळाल्यास, सर्व तक्रारदार शेतकरी आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. नेमके प्रकरण काय? केंधळी परिसरात गेल्या चार महिन्यांपासून विद्युत मोटारी चोरीला जाण्याचे सत्र सुरू आहे. याबाबत बाधित शेतकऱ्यांनी मंठा पोलीस ठाण्यात रीतसर तक्रारी दाखल केल्या तसेच **(पान ३ वर)**

प्रशासनाला आठ दिवसांचा अल्टिमेटम

पोलीस प्रशासनाच्या या उदासीन भूमिकेविरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पुढील आठ दिवसांत संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई न झाल्यास आणि शेतकऱ्यांचे मोटार पंप परत न मिळाल्यास, नवव्या दिवसापासून केंधळी गावातील सर्व तक्रारदार शेतकरी आमरण उपोषण सुरू करतील. या आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या सर्व परिस्थितीची जबाबदारी पोलीस प्रशासनाची राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

दुष्काळाच्या संकटात शेतकरी कुटुंबाला मिळाला शासनाचा आधार !

भिलपुरीतील अंबादास तांगडे कुटुंबाच्या आयुष्यात आशेचा नवा किरण; मुलीच्या शिक्षणापासून विवाहापर्यंतची जबाबदारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वीकारली



जालना/प्रतिनिधी : दुष्काळ परिस्थिती, अपुरे शेती उत्पन्न आणि वाढत्या आर्थिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांचे जीवन दिवसेंदिवस आव्हानात्मक बनत आहे. अशा परिस्थितीत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला आधार आणि मदतीचा हात दिल्याने संकटग्रस्त कुटुंबांनाही नव्या उमेदीने उभे राहण्याचे बळ मिळू शकते. याचे संवेदनशील उदाहरण जालना तालुक्यातील भिलपुरी येथील अंबादास तांगडे यांच्या कुटुंबाच्या माध्यमातून समोर आले आहे.

भिलपुरी येथील अंबादास तांगडे यांच्याकडे केवळ एक एकर शेती आहे. पत्नी मंदाबाई, दोन मुली, एक मुलगा आणि आई अशा सहा जणांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह याच शेतीवर अवलंबून आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीसमोर निर्माण झालेली आव्हाने आणि मर्यादित उत्पन्न यामुळे कुटुंबाला अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रतिकूल परिस्थिती असूनही कुटुंबाने जिद्द आणि कष्टाच्या जोरावर आपला संसार सुरू ठेवला आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना तालूक्यातील भिलपुरी येथील अंबादास तांगडे यांच्या घरी भेट दिली. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. दिवाळीच्या सणानिमित्त त्यांनी तांगडे कुटुंबासोबत वेळ घालवला आणि त्यांच्या घरातील पारंपरिक ग्रामीण भोजनाचाही आस्वाद घेतला. शेतकरी कुटुंबातून आलेला असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी आणि वेदनांची आपल्याला जाणीव असल्याचे सांगत, शासन कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या भेटीदरम्यान तांगडे कुटुंबातील मुलीशी संवाद **(पान ३ वर)**

आरोग्य सेवा अधिक सक्षम करून, गुणवत्तापूर्ण द्याव्यात : आयुक्त संजय काटकर



जालना/प्रतिनिधी : वैद्यकीय सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांनी दिले. वरिष्ठ स्तरावरून मिळालेले मार्गदर्शन निश्चित प्रेरणादायी ठरणार असल्याचे उपसंचालक डॉ कांचन वानेरे यांनी स्पष्ट केले.

आयुक्त सार्वजनिक आरोग्य विभाग संजय काटकर व उपसंचालक डॉ. कांचन वानेरे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र आष्टी येथे भेट देऊन आरोग्य विभागाच्या विविध कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी आरोग्य संस्थेतील विविध आरोग्यविषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी, उपलब्ध सुविधा, मनुष्यबळ व इतर प्रशासकीय बाबींची पाहणी करण्यात आली. तसेच आरोग्य संस्थांमधील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील , जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्याम राठोड, वैद्यकीय अधिकारी डॉ. गोळेगावकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (उझच्) रावसाहेब शेळके, ठइड्घ टीम, सर्व समुदाय आरोग्य अधिकारी (उक्ज) तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ऊसतोड कामगारांच्या कुटुंबासोबत दिवाळी साजरी; चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुलवला आनंदाचा प्रकाश!



गजानन माळकर पाटील

तालुका प्रतिनिधी मंठा : दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, रोषणाई, फराळ आणि कुटुंबासोबत साजरा केला जाणारा सण. मात्र आपल्या आनंदाच्या सणामागे अनेक कष्टकरी हातांचा घाम असतो. ऊसतोडणीच्या कामासाठी आपले गाव, घरदार आणि कुटुंबापासून दूर स्थलांतर करून येणाऱ्या मजूर बांधवांच्या आयुष्यातही दिवाळीचा थोडासा आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या लहान मुलांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे आणि त्यांच्या कुटुंबांना आपणही समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहोत, ही आपुलकीची जाणीव व्हावी, या सामाजिक भावनेतून सोमवार, दि. ९ नोव्हेंबर २०२६ रोजी मंठा तालुक्यातील गेवराई शिवारात वास्तव्यास असलेल्या ऊसतोड कामगार बांधवांच्या कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्यात आली. चाळीसगाव परिसरातून ऊसतोडणीच्या कामासाठी आलेल्या या कष्टकरी बांधवांनी गेवराई शिवारात तात्पुरत्या स्वरूपात आपला संसार थाटला आहे. या कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेण्यासाठी आयोजित केलेल्या या छोटेखानी उपक्रमात ऊसतोड कामगारांच्या महिला भगिनींना साडी भेट देण्यात आली. तसेच दिवाळीचा फराळ म्हणून चिवडा, विविध गोड पदार्थ, बालुशाही, सकाळच्या चहासोबत खाण्यासाठी टोस्ट, लहान मुलांसाठी फाइव्ह स्टार चॉकलेट आणि फटाके देण्यात आले. या माध्यमातून त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना दिवाळीचा आनंद घेता यावा, हा प्रयत्न करण्यात आला.

ऊसतोड कामगारांचे वास्तव : कष्टाच्या सावलीत वाढणारे बालपण!

ऊसतोड कामगारांचे जीवन हे केवळ रोजगारासाठी केलेले स्थलांतर नसून, ते संघर्ष, त्याग आणि परिस्थितीशी दोन हात करणाऱ्या संपूर्ण कुटुंबाचे जगणे आहे.

रोजगाराच्या शोधात हे कामगार आपल्या मूळ गावापासून शेकडो किलोमीटर दूर येतात. आपल्या गावातील घर, शेती, नातेवाईक, सामाजिक जीवन आणि मुलांच्या शिक्षणाच्या नियमित वातावरणापासून दूर जाऊन ऊसाच्या फडाजवळ तात्पुरत्या झोपड्या किंवा पालांमध्ये संसार उभा करतात. कुटुंबातील पुरुषांसोबत महिलांनाही ऊसतोडणीच्या कामात हातभार लावावा लागतो. पहाटे अंधारात दिवसाची सुरुवात होते. स्वयंपाक, पाणी भरणे, मुलांची काळजी, **(पान ३ वर)**

दर ९ प्रौढांमागे एक जण मधुमेहाच्या विळख्यात : डॉ. राजेश सेठिया

'फाइंड-रिस्क'ने जाणून घ्या पुढील १० वर्षांतील धोका!





जालना/प्रतिनिधी : जगभरात दर ९ प्रौढ व्यक्तींमागे एक व्यक्ती मधुमेहाने ग्रस्त असल्याचे अत्यंत धक्कादायक वास्तव समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आजार बळावेपर्यंत अनेकदा याची कोणतीही स्पष्ट लक्षणे दिसत नसल्याने रुग्णांमध्ये हृदयविकार, मूत्रपिंड निकामी होणे आणि दृष्टी गमावण्यासारखी गंभीर गुंतागुंत आधीच निर्माण झालेली असते. या पार्श्वभूमीवर, आंतरराष्ट्रीय मधुमेह महासंघाच्या मधुमेहावर लवकर कृती या यावर्षीच्या संकल्पनेचा आधार घेत, मधुमेहाचे वेळेत निदान आणि आगामी १० वर्षांतील धोका ओळखून जीवनशैलीत बदल करणे हीच काळाची गरज आहे, असे जालना येथील रुबी हॉस्पिटलचे मधुमेह तज्ञ डॉ. राजेश सेठीया यांनी स्पष्ट केले आहे.

दरवर्षी १४ नोव्हेंबर हा दिवस जागतिक मधुमेह दिन म्हणून पाळला जातो. त्या अनुषंगाने जागतिक व राष्ट्रीय पातळीवरील मधुमेहाच्या भयावह स्थितीवर प्रकाश टाकताना डॉ. राजेश सेठीया यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय मधुमेह महासंघाने '-लीं एरीश्रू`प उळ्ररलशींशी' (मधुमेहावर लवकर कृती) ही संकल्पना निश्चित केली आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश लवकर निदान, जोखीम कमी करणे आणि वेळेवर योग्य उपचार उपलब्ध करून देणे हा आहे. आज जगात दर ९ प्रौढांमागे एकाला मधुमेह असून जगभरात सुमारे ६३ कोटी ५० लाख लोकांना याचा थेट धोका आहे. यातील २५ कोटींपेक्षा जास्त नागरिकांना आपल्याला मधुमेह जडला असल्याचे माहीतच नाही. वेळीच पावले न उचलल्यास २०५० पर्यंत हा आकडा तब्बल ८५ कोटींवर पोहोचण्याची भीती आहे. भारताच्या बाबतीत सांगायचे झाल्यास देशात सुमारे १०.५ टक्के प्रौढ लोकसंख्येला म्हणजेच जवळपास ८ कोटींहून अधिक जणांना मधुमेह आहे. याशिवाय १३ ते २५ टक्के नागरिक 'प्री-डायबिटीस' (मधुमेहपूर्व अवस्था) या टप्प्यावर असून त्यांना पुढील पाच वर्षांत हा आजार जडण्याची दाट शक्यता असल्याचे ते म्हणाले.

पूर्वी हा आजार ५० ते ६० वयोगट आणि पुढील वयोगटातील नागरिकांमध्ये प्रामुख्याने आढळायचा. मात्र, आता वाढता लठ्ठपणा, व्यायामाचा अभाव, असंतुलित आहार आणि वाढत्या 'बीएमआय'मुळे अवघ्या १५-१६ वर्षे वयोगटातील मुला-मुलींमध्येही उच्च रक्तदाब व मधुमेहाची सुरुवात होत असल्याचे विदारक चित्र आहे. दक्षिण आशियाई वंशाच्या लोकांमध्ये जनुकीय जोखीम अधिक असल्याने भारतीयांनी सुरुवातीपासूनच अधिक सजग राहणे गरजेचे आहे. डॉ. सेठीया यांनी स्पष्ट केले की, मधुमेह हा केवळ रक्तातील साखरेपुरता मर्यादित आजार नसून तो शरीरातील महत्त्वाच्या अवयवांवर हळूहळू आघात करतो. जेव्हा मधुमेहाचे उशिरा निदान होते, तेव्हा तब्बल ५० टक्क्यांहून अधिक रुग्णांमध्ये आधीच गुंतागुंत निर्माण झालेली असते. याचा थेट परिणाम हृदय, मूत्रपिंड (किडनी), डोळे, मेंदू आणि नसांवर होतो. अशा वेळी सुरुवातीलाच 'अर्ली क्शन' (लवकर कृती) घेतल्यास गंभीर गुंतागुंती टाळून संभाव्य हृदयविकाराचा झटका किंवा अवयव निकामी होणे रोखता येते, रुग्णाची कार्यक्षमता आणि उत्पादकता टिकून राहते, तसेच आयुष्यमान वाढते. औषधोपचारांवरील प्रचंड आर्थिक भार आणि आरोग्य यंत्रणेवरील ताण कमी होतो.

वारंवार लघवी होणे, सतत तहान लागणे, भूक वाढणे, विनाकारण वजन कमी होणे, थकवा जाणवणे आणि दृष्टी धूसर होणे ही मधुमेहाची काही सामान्य लक्षणे आहेत. अशी लक्षणे आढळल्यास दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

मधुमेहाचे निदान वेळेत न झाल्यास हृदयविकार, मूत्रपिंडाचे आजार, डोळ्यांच्या समस्या आणि मज्जातंतूंचे नुकसान यांसारख्या गंभीर गुंतागुंती निर्माण होऊ शकतात. त्यामुळे केवळ आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा त्याचा धोका वेळीच ओळखणे आणि प्रतिबंधात्मक उपाय करणे अधिक महत्त्वाचे आहे. मधुमेहाचा धोका कमी करण्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि वजन नियंत्रण आवश्यक आहे. आहारात हिरव्या पालेभाज्या, फळे, कडधान्ये आणि तंतुमय पदार्थांचा समावेश करावा. साखरयुक्त पेये, अतिगोड पदार्थ आणि तेलकट खाद्यपदार्थांचे सेवन मर्यादित ठेवावे. दररोज किमान ३० मिनिटे चालणे किंवा व्यायाम करणे फायदेशीर ठरते. मधुमेहाचे निदान झालेल्या व्यक्तींनी नियमित रक्तशर्करा तपासणी करावी, डॉक्टरांनी दिलेली औषधे वेळेवर घ्यावीत आणि उपचारांमध्ये स्वतःहून बदल करू नयेत. योग्य उपचार आणि जीवनशैलीतील बदलांमुळे मधुमेह नियंत्रणात ठेवून निरोगी जीवन जगणे शक्य आहे. यंदाच्या जागतिक मधुमेह दिनाची संकल्पना प्रत्येकाला एक महत्त्वाचा संदेश देते-मधुमेहाची लक्षणे दिसण्याची वाट पाहू नका, वेळेवर तपासणी करा आणि जोखीम ओळखून प्रतिबंधात्मक पावले उचला. कारण मधुमेहाविरुद्धच्या लढाईत जागरूकता, लवकर निदान आणि तातडीने कृती हेच प्रभावी शस्त्र आहे.आजार लपवण्यापेक्षा तो वेळेवर ओळखून त्यावर तातडीने नियंत्रण मिळवणे गरजेचे आहे, असे डॉ. सेठीया म्हणाले.

फाईंड रिस्क अर्थात 'फिनिश डायबिटीज रिस्क स्कोअर' हे आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वमान्य असलेले वैज्ञानिक डिजिटल रिस्क कॅल्क्युलेटर आहे. पुढील १० वर्षांत एखाद्या व्यक्तीला मधुमेह होण्याची शक्यता किती टक्के आहे, याचे अचूक भाकीत याद्वारे केले जाते. यात वय आणि लिंग, बॉडी मास इंडेक्स (उंची आणि वजनाचे प्रमाण), कंबरेचा घेर, शारीरिक हालचाली व व्यायामाचे प्रमाण, दैनिक आहारातील भाज्या व फळांचे प्रमाण, उच्च रक्तदाबाची औषधे सुरू आहेत का?, कधी रक्तातील साखर वाढल्याची पार्श्वभूमी आहे का?, कुटुंबात आई-वडील, बहीण-भाऊ यांना मधुमेहाचा इतिहास आहे का? या घटकांचे विश्लेषण करून गुण दिले जातात. या गुणांची गोळाबेरीज करून १० वर्षांतील संभाव्य धोका काढला जातो. स्कोअर जास्त आल्यास वेळेत आहार, व्यायाम आणि वैद्यकीय सल्ला घेऊन मधुमेह ढकलता येऊ शकतो अथवा तीव्रता कमी करता येऊ शकते. त्यादृष्टीने सौ. जमुनाबाई शिवरतन बगडिया चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने रुबी हॉस्पिटलमध्ये दि. १४ ते २० नोव्हेंबर दरम्यान सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती डॉ. सेठीया यांनी दिली.